ePaper

पाकिस्तानवर उपासमारीची वेळ, जागतिक बँकेच्या अहवालातून धक्कादायक खुलासा

| वर्ष - 8 | अंक - 302 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- क्लासेनने क्रिकेटमधून का घेतली?
- अश्विनने मैदानावरच पंचांशी घातला वाद
- 'माझा अपमान जसा व्हायरल झाला
- भारतातील रस्ते अमेरिकेसारखे होतील

www.mahaenews.com | मंगळवार , दि. 10 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## ठाकरे बंधू एकत्र येतील का? मुंबई महानगरपालिका निवडणुकीत त्याचा कितपत फरक पडेल ? मुंबईकर त्यांची एकी स्वीकारतील का ?

# मुंबई महानगरपालिका कौल! कोण तळ्यात, कोण मळ्यात!

**भाजपाची मुंबईसाठी 'स्ट्रॅटेजी' काय असेल ? 'महायुती' भक्कम राहील का ? मुंबईकरांचा रोज कोणावर ?**

| मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज

**हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या अफाट लोकप्रियतेमुळे 'ठाकरे' हा मुंबईचा ब्रँड असून ठाकरे बंधू एकत्र येण्याची प्रचंड उत्सुकता मुंबईकरांना आहे. त्या दोघांच्या एकत्र येण्याचा परिणाम मुंबई महानगरपालिका निवडणुकीत होईल का ? यावेळी भाजपाची 'स्ट्रॅटेजी' काय असेल? आणि 'महायुती' भक्कमपणे एकत्रच राहील का ? यासारख्या प्रश्नांची उत्तरे देणारा अत्यंत महत्त्वाचा सर्व्हे पुढे आला आहे. केवळ मुंबईचेच नव्हे, तर संपूर्ण देशाचे लक्ष मुंबई महानगरपालिका हेच आहे, हे निश्चित !**



### नेमके कोणाचे पारडे जड?

मुंबई महानगरपालिका निवडणुकांसाठी सज्ज होत असताना दिसत आहे. अशावेळी शहरातील राजकीय घडामोडींकडे दुर्लक्ष करणे अवघड आहेच. एका प्रसिद्ध संस्थेने घेतलेल्या सर्वेक्षणानुसार, भारतीय जनता पार्टी हीच या राजकीय शर्यतीत आघाडीवर आहे.

मात्र, उबाठा गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना एकत्र आले तर भाजपाला चांगली टक्कर देऊ शकतील.

शिवाय त्यांची 'महायुती' कायम राहिली, तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसैनिकांचा मोठा हातभार त्यांना लाभेल आणि सत्ता ही शेवटी भाजपाप्रणित 'महायुती' कडेच जाण्याची शक्यता आहे, असा निवडणूक सर्व्हे सांगतो.

### मतदार प्रचंड असंतुष्ट आणि असमाधानी...

भावनिक संबंध, राजकीय वारसा आणि सध्याच्या नागरी व्यवस्थेविरुद्ध एकूणच असंतोषाची लाट दिसून येते. सर्वेक्षणातून काढलेल्या निष्कर्षांवरून मुंबईकरांमध्ये असंतोषाची भावना वाढत असल्याचे दिसून येत आहे. केवळ निवडून आलेल्या नगरसेवकांच्या दीर्घकाळ अनुपस्थितीमुळेच नाही, तर प्रशासकांनी दोन वर्षांहून अधिक काळ ज्या पद्धतीने कार्यक्रम चालवला आहे, त्याबद्दलही हीच भावना दिसून येते. अनेक नागरिकांनी दुर्लक्षित आणि अकार्यक्षम नागरी रचनेत अडकल्याची भावना व्यक्त केली आहे.

### ठाकरे बंधू एकत्र येणे महत्त्वाचे

या सर्वेक्षणादरम्यान सर्वात मोठा प्रश्न होता, तो म्हणजे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येतील का? ते वेगवेगळे लढले किंवा एकत्र आले, तरी आता पुलाखालून बरेच पाणी गेले असल्यामुळे त्याचा निवडणुकीच्या निकालावर फारसा परिणाम होणार नाही, असे अनेकांनी मत व्यक्त केले. गेल्या निवडणुकीत एकत्रित असलेली शिवसेना आणि भारतीय जनता पार्टी यांच्या नगरसेवकांमध्ये फक्त तीन नगरसेवकांचा फरक होता. पण, त्यावेळी 'युती' असल्यामुळे भाजपाने शिवसेनेला विरोध केलेला नव्हता. त्यामुळे सहजपणे शिवसेनेची सत्ता आली, ती परिस्थिती आता नाही.

### आता फाटाफूट महत्त्वाची..

गेल्या काही दिवसात मूळ शिवसेनेला खिंडार पाडून एकनाथ शिंदे हे बाहेर पडले आणि त्यांची ताकद दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. मुंबईतील अनेक माजी नगरसेवक त्यांच्या पक्षात गेले असून त्यांनी भाजपाशी 'महायुती' केली आहे. शिवाय राष्ट्रवादीचा अजित पवार गट आहेच.

### उद्धव गटाची ताकद कमकुवत..

या सर्व राजकीय पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे गटाची ताकद अगदीच कमकुवत झाली असून मनसे त्यांना मिळाली, तरी दोघे मिळून सत्ता बळकवतील, अशी मुळीच शक्यता दिसत नाही. त्यांच्या 'महाआघाडी' मध्ये मुंबईत ताकद नसणारी राष्ट्रवादी ( शरद पवार गट ) आणि काँग्रेस असल्यामुळे त्या दोन पक्षांचा हातभार फारसा लागणार नाही, असे दिसून आले आहे.

### खरा सामना भाजपा विरुद्ध ठाकरे बंधू !

उद्धव आणि राज ठाकरे एकत्र येणार, हे गृहीत धरले असल्यामुळे त्यांची भावनिक ताकद आणि भाजपाची विकासाद्वारे दाखवलेली ताकद यातच खरा सामना होणार आहे. भाजपाच्या जोडीला शिवसेनेची म्हणजे एकनाथ शिंदे यांचीही मोठी ताकद उभी आहे. पण, मुंबईकरांच्या मनात अजून तरी एकनाथ शिंदे यांच्याबाबत विश्वासार्हता आणि आपलेपणा दिसत नाही. पण, शिस्तबद्धता, प्रचंड संघटन, निवडणुकीतील विजयासाठी आवश्यक त्या बाबी सादर करण्याची हातोटी आणि नेत्यांची फौज असल्यामुळे भाजपाच शेवटी मुंबई महानगरपालिकेत बाजी मारेल, असे सर्वेक्षणात दिसत आहे.

### 25 वर्षे सत्तेचा उलटा परिणाम

मुंबई महानगरपालिकेची सत्ता सलग २० ते २५ वर्षे शिवसेनेकडे होती. पण, या काळात मुंबईकरांपुढील अडचणी सुटू शकल्या नाहीत. उलट मुंबई महानगरपालिका भ्रष्टाचाराच्या जाळ्यात अडकत गेली, असे अनेकांचे म्हणणे आहे. मुंबईला जबाबदार म्हणून कोणीच नाही, रस्ते बरोबर नाहीत, गटारे तुंबलेली आहेत आणि कोणीही याचा वाली नाही. एकेकाळी आम्ही नगरसेवकांशी थेट संपर्क साधू शकतो होतो, आता सगळे नगरसेवक 'गब्बर' झाले असल्यामुळे भेटत नाहीत अशी खंत काहींनी व्यक्त केली. सर्व परिस्थितीला उद्धव ठाकरे जबाबदार असल्याच्या चर्चांना मात्र उधाण आहे.

(उर्वरित वृत्त पान 3 वर)

# एमआयडीसीकडून आयटी पार्कची पाहणी

## वॉटर पार्क बनल्यानंतर नेत्यांसह प्रशासनाला जाग आली

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्क पावसामुळे वॉटर पार्क बनल्यानंतर अखेर राजकीय नेत्यांसह प्रशासनाला जाग आली. आमदार शंकर मांडेकर यांनी सोमवारी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासह (एमआयडीसी) इतर स्थानिक यंत्रणांसह आयटी पार्कमध्ये संयुक्त पाहणी केली. या वेळी नैसर्गिक प्रवाह रोखले गेल्याने पाणी तुंबत असल्याची बाब स्पष्ट झाली.**



आयटी पार्कमधील वाहतूक कोंडी, पाणी साचण्याची समस्या यांची पाहणी सोमवारी करण्यात आली. या वेळी आमदार मांडेकर यांच्यासह 'पीएमआरडीए'च्या मुख्य अभियंता रिनाज पठाण, 'एमआयडीसी'चे मुख्य अभियंता नितीन वानखेडे, हिंजवडी ग्रामपंचायतीचे पदाधिकारी आणि आयटीयन्स उपस्थित होते. यावेळी आयटी पार्क टप्पा दोनमधील डोहलर कंपनीसमोरील रस्त्याची पाहणी करण्यात आली. तिथे पाणी साचण्याची समस्या सर्वाधिक आहे. तिथे एमआयडीसीकडून सांडपाणी वाहिन्या बसविण्याचे काम प्रलंबित आहे. ते तातडीने पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले.आयटी पार्कमध्ये अनेक मोठे निवासी प्रकल्प आणि कंपन्यांनी पाण्याचे नैसर्गिक प्रवाह रोखले आहेत. यामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्यात अडचणी येत आहेत. याच वेळी काही निवासी प्रकल्प आणि कंपन्यांतून प्रक्रिया न करता सांडपाणी बाहेर सोडले जात आहे. हे पाणी पुढे शेतीजमिनींमध्ये जात आहे. त्यामुळे काही शेतकऱ्यांनी संरक्षक भिंती बांधून पाणी जाण्याचा मार्ग रोखला आहे. त्यामुळे पाणी वाहून न जाता रस्त्यावर साचत आहे. या प्रकरणी निवासी प्रकल्प आणि कंपन्यांवर कारवाई करण्याची शिफारस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला केली जाणार आहे.हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोचा मार्ग आयटी पार्कमधील ८ किलोमीटर रस्त्यावर आहे. त्या रस्त्यावर सर्वाधिक समस्या पाहणीवेळी आढळून आल्या. या रस्त्यावर ठिकठिकाणी मेट्रोच्या कामाचे साहित्य आणि राडारोडा पडलेला आहे. या राडारोड्यामुळे सांडपाणी वाहिन्या तुंबत आहेत. याचबरोबर रस्त्याच्या बाजूचे नालेही बुजविण्यात आल्याने पाणी वाहून जाण्यास मार्ग राहिलेला नाही. यामुळे रस्त्यावर पाणी साचत असल्याचे निदर्शनास आले. पुणे आयटी सिटी मेट्रो रेल कंपनीकडून हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोचे काम सुरू आहे. कंपनीने मेट्रोच्या कामाच्या ठिकाणी असलेला राडारोडा तातडीने उचलावा, अशी सूचना करण्यात आली. मेट्रोच्या कामाच्या ठिकाणी रस्त्यांची दुर्दशा झालेली आहे. हे रस्ते व्यवस्थित करावेत, असे निर्देश कंपनीला देण्यात आले.हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोचा मार्ग आयटी पार्कमधील ८ किलोमीटर रस्त्यावर आहे. त्या रस्त्यावर सर्वाधिक समस्या पाहणीवेळी आढळून आल्या.

### पाणी जाण्याचा मार्ग अडविला

या रस्त्यावर ठिकठिकाणी मेट्रोच्या कामाचे साहित्य आणि राडारोडा पडलेला आहे. या राडारोड्यामुळे सांडपाणी वाहिन्या तुंबत आहेत. याचबरोबर रस्त्याच्या बाजूचे नालेही बुजविण्यात आल्याने पाणी वाहून जाण्यास मार्ग राहिलेला नाही. यामुळे रस्त्यावर पाणी साचत असल्याचे निदर्शनास आले. पुणे आयटी सिटी मेट्रो रेल कंपनीकडून हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोचे काम सुरू आहे. काही निवासी प्रकल्प आणि कंपन्यांकडून प्रक्रिया न करता सांडपाणी बाहेर सोडले जात आहे. हे सांडपाणी शेतात जात असल्याने काही शेतकऱ्यांनी पाणी जाण्याचा मार्ग अडविला आहे. हे निवासी प्रकल्प आणि कंपन्यांवर कारवाई केली जाणार आहे.

# आयटी पार्क'साठीचे प्रकल्प 'कागदा'वरच

## भूसंपादनाची जबाबदारी सहा महिन्यांत तिसऱ्या यंत्रणेवर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमधील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यात सरकारी लाल फितीचा अडसर निर्माण झाला आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) आयटी पार्कमधील उड्डाणपुलासह पर्यायी रस्त्यांच्या सुमारे ६५० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे नियोजन केले आहे. या प्रकल्पांसाठी भूसंपादनाची जबाबदारी सहा महिन्यांत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आधी 'एमआयडीसी' आणि नंतर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे (पीएमआरडीए) देण्यात आली.**



या गोंधळामुळे आयटी पार्कमधील प्रकल्प कागदावरच राहिले आहेत.हिंजवडी आयटी पार्कमधील वाहतूककोंडीची समस्या दिवसेंदिवस बिकट होत आहे. आयटी पार्कमध्ये वाहनांची संख्या गेल्या काही वर्षांत प्रचंड प्रमाणात वाढली. त्यामुळे सध्याचे रस्ते अपुरे पडू लागले आहेत. त्यातच या रस्त्यांना पर्यायी रस्ते करण्याकडे दुर्लक्ष झाल्याने वाहतूककोंडी ही नित्याचीच बाब आहे. त्यामुळे उड्डाणपुलासह नवीन पर्यायी रस्ते तयार करण्याचा प्रस्ताव आहे. हिंजवडीतील लक्ष्मी चौकात सातत्याने वाहतूककोंडी होते.

ही कोंडी सोडविण्यासाठी या चौकात उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. हा पूल चारपदरी आणि ७२० मीटर लांबीचा असेल. त्यासाठी ४० कोटी रुपयांचा खर्च होणार आहे.हिंजवडीतील शिवाजी चौक ते स्मशानभूमी या रस्त्याचे रुंदीकरण केले जाणार आहे. हा रस्ता ९०० मीटर लांबीचा आहे. हा रस्ता सहापदरी केला जाणार आहे. यासाठी २४.७४ कोटी रुपये खर्च येणार आहे. याचबरोबर आयटी पार्कमधील टप्पा एकपासून टप्पा तीनला जोडणारा नवीन रस्ता बांधला जाणार आहे. हा रस्ता ५ किलोमीटर लांबीचा असेल आणि त्यासाठी ५८४.१४ कोटी रुपये खर्च येईल.आयटी पार्कमधील प्रकल्पांसाठीची जागा सार्वजनिक बांधकाम विभाग संपादित करून 'एमआयडीसी'ला देणार होता. परंतु, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत 'एमआयडीसी'नेच हे भूसंपादन करावे, असा निर्णय झाला. सार्वजनिक बांधकाम विभागाने आधी भूसंपादन करून नंतर ही जागा 'एमआयडीसी'ला हस्तांतरित करण्यात वेळ घालवू नये. थेट 'एमआयडीसी'नेच भूसंपादन करून रस्त्यांचे काम सुरू करावे, असे निर्देशही त्या वेळी देण्यात आले होते. यामुळे या प्रकल्पांचे भूसंपादन करण्यासाठी 'एमआयडीसी'कडून प्रशासकीय प्रक्रिया सुरू झाली. त्यानंतर मुख्यमंत्री कार्यालयात झालेल्या बैठकीत या प्रकल्पांसाठीचे भूसंपादन 'पीएमआरडीए'कडे देण्यात आले. गेल्या सहा महिन्यांत केवळ भूसंपादन कोण करणार याचा निर्णय होऊ शकला नव्हता.

### भूसंपादन केले जाणार

यामुळे भूसंपादन होऊ शकले नाही आणि हे प्रकल्पही रखडले.आयटी पार्कमधील उड्डाणपुलासह पर्यायी रस्त्यांसाठी 'पीएमआरडीए'कडून भूसंपादन केले जाणार आहे. या प्रकल्पांसाठीच्या जमिनीच्या सर्वेक्षणासह इतर आवश्यक बाबी 'एमआयडीसी'ने पूर्ण केल्या आहेत. भूसंपादन झाल्यानंतर तातडीने या प्रकल्पांचे काम सुरू होईल.

## पिंपरी चिंचवड सायबर सेलची कारवाई

# सायबर गुन्ह्यांची उकल करण्यात पिंपरी चिंचवड राज्यात पहिले!

### 135 आरोपी अटकेत, 90 टक्के गुन्ह्यांची उकल

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड - पिंपरी चिंचवड शहरात ऑनलाईन फसवणुकीचे गुन्हे दिवसेंदिवस वाढत आहेत. अशातच पोलिसांच्या सायबर सेलने मात्र धडाकेबाज कारवाई करत राज्यात गुन्हे उकल करण्यात पहिला क्रमांक पटकावला आहे. पोलिसांनी सायबर गुन्हेगारांचे अक्षरशः कंबरडे मोडले आहे. गेल्या दीड वर्षात तब्बल १३५ आरोपींना अटक करत ९० टक्क्यांहून अधिक गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. फसवणूक झालेल्या अनेक नागरिकांचे पैसेही परत मिळवून देण्यात आले आहेत.**




पिंपरी चिंचवड हे आयटी हब म्हणून विकसित होत असलेल्या शहरांपैकी एक आहे. याच शहराकडे सायबर चोरट्यांनी आपला मोर्चा वळवला होता. शेअर बाजारातील गुंतवणुकीचे आमिष, व्हॉट्सअ‍ॅप लिंकद्वारे फसवणूक, कोर्ट-कस्टमच्या नावाने धमकी अशा विविध प्रकारांनी लाखो रुपयांची फसवणूक झाली होती. मात्र, पोलिसांनी केलेल्या आक्रमक तपासामुळे या गुन्हेगारांना चांगलाच दणका बसला आहे.

सायबर पोलिसांनी केवळ शहरातीलच नव्हे तर कर्जतसारख्या बाहेरील भागातीलही गुन्हे उघडकीस आणले आहेत. विशेष म्हणजे अनेक पीडितांना त्यांच्या गमावलेल्या रकमेपैकी काही हिस्सा परत मिळाल्याचेही सांगण्यात येते.सायबर गुन्हे टाळण्यासाठी स्वतःची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. कोणत्याही लिंकवर क्लिक करताना किंवा अज्ञात व्यक्तीच्या कॉलला प्रतिसाद देताना सतर्क राहावे, असे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे. पोलिसांकडून वेळोवेळी जनजागृती मोहीम राबवण्यात येत असून, फसवणूक झाल्यास तातडीने तक्रार नोंदविण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

जिवावर उदार होऊन काम सायबर गुन्ह्याच्या तपासासाठी पिंपरी चिंचवड पोलिसांचे एक पथक राजस्थानमध्ये गेले होते. त्यावेळी सायबर चोरट्याला अडविण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला असता चोरट्यांनी सहायक निरीक्षक प्रवीण स्वामी यांच्या अंगावर गाडी घालून त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केला. याबाबत राजस्थानमध्ये गुन्हा देखील दाखल आहे.

#### सायबर चोरट्यांपासून असा करा बचाव

अनोळखी लिंक किंवा अ‍ॅप डाउनलोड करू नका.
बँक खाते, ओटीपी पासवर्ड कोणालाही शेअर करू नका.
फोन, ईमेल, व्हॉट्सअ‍ॅपवर आलेल्या आमिषांना बळी पडू नका.
फिशिंग कॉल किंवा मेसेज आल्यास तात्काळ दुर्लक्ष करा.
सार्वजनिक वायफाय वापरताना आर्थिक व्यवहार टाळा.
सायबर सुरक्षा अपडेट व अँटीव्हायरस वापरा.
फसवणूक झाल्यास त्वरित सायबर पोलीस ठाण्यात तक्रार करा.

> सायबर गुन्हेगारांकडून सर्वसामान्यांना गंडा घालण्यात येतो. या गुन्ह्यांच्या तपासासाठी सूचना केल्या आहेत. गुन्ह्यांची उकल करण्यासोबतच संशयितांना अटक करून कायदेशीर करवाई करण्यात येत आहे. ही कारवाई प्रभावी ठरत असून सायबर गुन्हे कमी होण्यास मदत होणार आहे.
>
> **-विनय कुमार चौबे,** पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड

## पावणेदोन लाख आरसी आरटीओ कार्यालयात पडून

### पत्ते न सापडल्याने टपाल परिवहन कार्यालयाकडून परत

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पत्ता न सापडणे, सदनिका बदलणे, तसेच, अपूर्ण पत्ता अशा विविध कारणांमुळे गेल्या काही वर्षात तब्बल १ लाख ७५ हजारआरसी बूक रिटर्न आले आहेत. पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) ते येऊन पडतात. त्यातील सुमारे ४५ ते ५० हजार आरसी बूक वाहनमालक घेऊन गेले आहेत. तर बाकीचे गठ्ठे आरटीओ कार्यालयात पडून आहेत संबंधित वाहनमालक आल्यानंतर त्याचे वाटप करण्यात येते..**




परिवहन विभागाकडून २०१२ पासून स्मार्ट कार्ड स्वरूपात आरसी देण्यास सुरुवात केली. अगोदर ही आरसी वाहन विक्रेत्यांकडेच मिळत असे. मात्र, स्मार्ट आरसी सुरू झाल्यापासून पोस्टामार्फत संबंधित वाहनधारकास त्यांच्या पत्त्यावर पाठविले जात आहेत. मात्र, पत्ता सापडला नाही, घर बंद आदी कारणांमुळे दरवर्षी हजारोंच्या घरात ती परत येत आहेत. २०२२-२३ या वर्षात १३ हजार ८७२ तर, २०२३-२४ या वर्षात १२ हजार ३८४ आरसी टपाल कार्यालयातून आरटीओत आली. आरसी कार्ड छत्रपती संभाजीनगर येथून विविध टपाल कार्यालयात वितरित केली जातात. त्यानंतर, पोस्टमन पत्त्यावर जाऊन ती पोहोचवतात. मात्र, आरसी परत येण्याचे प्रमाण दरवर्षी जास्त आहे. वाहनमालकांचे पत्ते जुने असतात, मोबाइल क्रमांक बंद असतात, अनेकदा पत्ते एजंटचे असतात. त्यामुळे कार्ड परत येतात. ते परत येण्याचे प्रमाण ५ ते १० टक्के आहे. पंधरा दिवसांनतर पोस्टाकडून असे आरसी बूक आरटीओ कार्यालयात जमा केले जातात, अशी माहिती टपाल कार्यालयाकडून देण्यात आली.

## मुंबई महानगरपालिका कौल!

(पान 1 वरुन)

कोणत्याही परिस्थितीत ही महानगरपालिका जिंकायचीच, या इर्षेने मैदानात उतरणाऱ्या भाजपासाठी कसोटीचा काळ असला तरी मतदार बऱ्यापैकी त्यांच्या पाठीशी दिसतील आणि त्यासाठी मजबूत संघटना कामी येईल, असे दिसते. शहरात भाजपा विकास प्रथम, अशी कहाणी पुढे नेण्यासाठी त्यांच्या मजबूत संघटनात्मक व्यवस्थेवर आणि राज्य-केंद्र सरकारच्या समन्वयावर अवलंबून आहे. असे असताना सर्वेक्षणातून असेही दिसून येते की, ही एकतर्फी लढाई नाही.


**बाळासाहेब ठाकरे यांचे नाव..**

मराठी मातृभूमीच्या भागात ज्या ठिकाणी वंदनीय बाळासाहेब ठाकरेंची प्रतिमा अजूनही मोठी आहे, तिथे त्यांना पाठिंबा मिळत आहे. त्या भागात ठाकरे ब्रँड अजूनही टिकून आहे आणि ठाकरे बंधू एकत्र आले तर तो ब्रँड नक्कीच त्यांना यश देऊन जाईल. उद्धव ठाकरे आपल्या भागातील तळागाळातील नागरिकांची संपर्क साधून आहेत. त्यामुळे दोन्ही गट राजकीयदृष्ट्या दुफळी निर्माण झालेले असले तरी मुंबई ही बाळासाहेबांची आहे आणि त्यांचे कुटुंब अजूनही आमचीच भाषा बोलते, त्यामुळे आम्ही त्यांच्याच पाठीशी ठाम राहणार, असे अनेक नागरिक बोलून दाखवतात.

**दोन्ही बंधूंची हातमिळवणी महत्त्वाची**

उद्धव आणि राज यांच्या हात मिळवण्याच्या कल्पनेला मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाठिंबा दिसत असून दोन्ही पक्षाचे नेते फक्त वक्तव्य करत असले तरी एकत्र येतील का नाही? याची शंका अजूनही व्यक्त होत आहे. काही जणांच्या मते हे दोघे बंधू पुन्हा मुंबईच्या राजकारणात शिवसेनेला मध्यवर्ती स्थान मिळवून देऊ शकतात. त्यांच्याबाबत नागरिकांमध्ये भावनिक आत्मियता आहे हे नक्की !

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### वासनानाश हाच मोक्ष.

पुष्कळदा भक्ती म्हणजे काय, किंवा परमार्थ कशाला म्हणतात हेच आपल्याला कळत नाही. ज्याला प्रपंच नीट करता येत नाही, त्याला नाही परमार्थ करता येणार. प्रपंचाला कंटाळून भक्ती नाही येणार. कंटाळा प्रपंचाचा येण्यापेक्षा विषयांचा आला पाहिजे. मला सुख व्हावे हा प्रत्येक जीवाचा मुख्य हेतू असतो. मोक्ष म्हणजे निरतिशय सुखाचा अनुभव होय. ‘जिवंतपणी मिळालेली आत्यंतिक सुखाची स्थिती’ अशी मोक्षाची व्याख्या करता येईल. खरोखर, भगवंताजवळ काय कमी आहे ? एक आपले मन त्याला द्यावे आणि त्याची श्रद्धायुक्त भक्ती करावी. काळजी करणे म्हणजे भगवंतावर भरवसा नसणे होय. प्रारब्धावर देह टाकणे ही खरी संन्यासवृत्ती होय. वासना न ठेवता आपल्या हातून कर्मच होत नाही त्याला काय करावे ? माझे समाधान माझ्याजवळ असताना दुसरीकडे ते मिळेल असे आपल्याला वाटते हेच आपले चुकते. हवेपण संपले नाही तोपर्यंत समाधान नाही. हव्यास मरेपर्यंत सुटतच नाही, हे सर्व रोगांचे मूळ आहे; आणि म्हणूनच ज्याची वासना नाहीशी झाली तो मोक्षत्वाला गेला खरा. आशेची निराशा झाली नाही तोपर्यंत भगवंताचा दास नाही होता येणार. आशा जेव्हा मनात उठेल तेव्हा ती भगवंताला अर्पण करावी. प्रत्येकाला वाटते मी श्रीमंत व्हावे. पण कितीजण तसे होतात ? म्हणजे ही निराशाच नाही का ? प्रपंच खरोखरीच नाटकासारखा आहे. नाटकामध्ये एखादा मनुष्य राजा झाला काय किंवा भिकारी झाला काय, प्रत्यक्ष जगामध्ये त्याला किंमत नाही. उलट, भिकाऱ्याचे काम करणाऱ्याने जर ते उत्तम केले, तर लोक त्याचे कौतुक करतात. तसे, प्रपंचामध्ये कुणी श्रीमंत असला काय आणि कुणी गरीब असला काय, याला महत्त्व नसून, त्याने भगवंताचे अनुसंधान किती ठेवले याला खरे महत्त्व आहे. आपण पैसा साठविला तर गैर नाही; पण त्याचा आधार न वाटावा. अनुसंधानाच्या आड त्याला येऊ देऊ नये. विषयावर जोपर्यंत तुमचे सुख अवलंबून आहे तोपर्यंत भक्तीचे खरे सुख मिळत नाही. एक भगवंतच मनापासून हवा असे वाटले, म्हणजे तो प्राप्त होतो. ‘मी करतो’ असे कधीच म्हणू नये. मी आपल्या तपश्चर्येने भगवंताला पाहीन असे जो म्हणतो त्याला भगवंताचे दर्शन होणे कठीणच असते. विषय मिळाला नाही म्हणजे तळमळ लागते, त्याप्रमाणे भगवंत भेटला नाही तर तळमळ लागावी. आजच्या आपल्या स्थितीत आपल्याला काय करता येणे शक्य आहे, हे प्रथम पहावे. परमार्थ समजून जो त्याचे आचरण करील, त्याला तो लवकर साधेल. त्या माणसाला प्रपंच सोडून जाण्याचे कारण उरणार नाही.

बोधवचन:- हवे व नको याचा आग्रह नसावा. यातच वासनेचे मरण आहे.

# ठाकरे बंधूंच्या गळाभेटीने काय फरक पडू शकतो ?



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**महाराष्ट्रात दोन विषय अत्यंत चवीने चघळले जात आहेत. या दोनही विषयातले सत्य बऱ्यापैकी संपलेले आहे. मात्र, चर्वीत चर्वण करून चोथा झाल्यानंतरही त्यावर चर्चा करण्याची आपल्या राजकारण्यांची आणि मीडियाची सवय आहे.**



### दोन्ही विषय चर्चेपलीकडे..

सध्या हे विषय प्रत्येकाच्या तोंडात आहेत. यापैकी पहिला विषय आहे, तो उद्धव ठाकरे-राज ठाकरे हे एकत्र येणार काय? आणि दुसरा विषय आहे तो राहुल गांधी यांनी महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक निकाल ‘फिक्सिंग’ असल्याचा केलेला आरोप ! या दोनही विषयांमधील सत्व कधीच निघून गेले आहे. अशा प्रकारची चर्चा करून फार काही साधले जाईल, जनतेचे कल्याण होईल किंवा महाराष्ट्रातील राजकारणाला अत्यंत वेगळे वळण लागेल, असे सध्या काही दिसत नाही.

### राज ठाकरे यांनी शिवसेना का सोडली?

यातील उद्धव ठाकरे राज ठाकरे एकत्र येतील का हा विषय किती पोकळ आहे, हे प्रत्येकाला नकीच माहिती आहे. राज ठाकरे हे उद्धव ठाकरे आणि कंपनीला कंटाळून शिवसेनेतून बाहेर पडले. त्यानंतर स्वतःचा पक्ष काढला. मनसेने लढलेल्या पहिल्या विधानसभा निवडणुकीत त्यांना बऱ्यापैकी यशही आले. नाशिकसारखी महत्वाची महानगरपालिका त्यांच्या ताब्यात आली. तर महापालिका पुण्यामध्ये विरोधी पक्ष नेतेपद ही त्यांना प्राप्त झाले होते. मात्र, राज ठाकरे यांना ते टिकवता आले नाही. वाढवता आले नाही.

### राज ठाकरे यांचे राजकारणातील स्थान..

आता राज ठाकरे यांची अवस्था महाराष्ट्राच्या राजकारणात, शासनात शून्यवत झाली आहे. खुद्द शरद पवार यांनी राज ठाकरे यांच्या भाषणांना होणारी गर्दी मतांमध्ये परावर्तित होत नाही, हे स्पष्ट सांगितले आहे. थोडक्यात, शरद पवार यांच्या दृष्टीने राज ठाकरे यांचे सध्याचे उपयोगिता मूल्य संपले आहे. दुसरीकडे २०१९ सालात महाविकास आघाडी स्थापन करण्यात उद्धव ठाकरे यांना भरीस पाडले होते. त्यांच्याबद्दलही शरद पवार यांना फारशी आस्था राहिलेली दिसत नाही. अशा परिस्थितीत केवळ मुंबई महापालिका ताब्यात ठेवण्यासाठी उद्धव ठाकरे राज ठाकरे एकत्र येणार आहेत, असे दिसते.

### मुंबई महापालिकेचे समीकरण..

उद्धव ठाकरे यांचा मुंबईत करिष्मा आहे आणि त्यामुळे ते महापालिका निर्विवाद जिंकतील, असे काही दिसत नाही. तर दुसरीकडे राज ठाकरे यांचीही तीच अवस्था आहे. दोघे एकत्र आले तरीही शिवसेना उद्धव ठाकरे यांना गेल्या निवडणुकीत जेवढ्या जागा मिळाल्या होत्या, तेवढ्या जागा मिळतील असे वाटत नाही. त्यामुळे हे बंधू एकत्र आले तरी मुंबईच्या राजकारणात, महापालिकेच्या निवडणुकीत फार मोठा चमत्कार घडेल असे मुळीच दिसत नाही.

### ठाकरे बंधूंचे एकत्रीकरण..

ठाकरे बंधू एकत्र येण्यामुळे कोणकोणत्या शक्यता निर्माण होऊ शकतात,याचा विचार नक्कीच होणार. मात्र, महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका संपूर्ण महाराष्ट्रात असल्याने हे दोघे बंधू मुंबई वगळता महाराष्ट्रात आपला प्रभाव पाडण्यासाठी राज्यभरात कुठे जातील, ही शक्यताही नाही. मुंबई केंद्रित राजकारण, अर्थकारण, समाजकारण हा त्यांचा प्रमुख उद्दिष्टाचा भाग आहे. आर्थिकदृष्ट्या मुंबई एकीकडे आणि देश दुसरीकडे हे चित्र असल्याने देशाची आर्थिक राजधानी मुंबई आहे. त्यावर आपली सत्ता असणे हे सर्वच पक्षांच्या दृष्टीने महत्त्वाचे असते.

### बाळासाहेबांचा फंडा निराळाच..

स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी मुंबई ताब्यात ठेवण्याचा फंडा योग्य पद्धतीने सांभाळला होता. महाराष्ट्राचे राजकारण महाजन-मुंडे सांभाळायचे तर मुंबई बाळासाहेब ठाकरे हा अलिखित करार होता आणि तो महाजन-मुंडे-ठाकरे यांनी पाळला. मात्र, बाळासाहेब ठाकरे यांच्यानंतर ही रचना बदलली, सन २०१९ ला संपूर्ण चित्रच बदललेले पाहायला मिळाले. यात वैयक्तिक महत्वाकांक्षांपासून अनेक विषय सम्मिलित होते. संजय राऊत हे बाळासाहेब ठाकरे असताना केवळ राज्यसभेचे सदस्य होते, मात्र, आज ते पक्ष स्वतः चालवत असल्याच्या अविर्भावात बोलतात. यावरून व्यक्तीसापेक्ष बदललेली रचना स्पष्टपणे अधोरेखित होते. साहजिकच बाळासाहेब यांच्या काळातली शिवसेना राहिली नसेल, तर महाजन-मुंडे यांच्या काळातला भाजप राहणार नाही, हेही तेवढेच स्पष्ट आहे, हे कोणालाही समजेल.

### महाराष्ट्राचे राजकीय गणित..

चला, आता महाराष्ट्राचे राजकीय गणित मांडू या..एकूण सात महत्त्वाचे पक्ष : दोन शिवसेना, दोन राष्ट्रवादी, मनसे, भाजप, काँग्रेस..स्थानिक स्वराज्य संस्था आणि विशेषतः मुंबईच्या महापालिकेकडे गळ टाकून बसलेले आहेत. यामध्ये भारतीय जनता पक्ष आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी या पक्षांचे बहुतेक सगळ्यांशी साटेलोटे होऊ शकते. यात, भाजप काँग्रेस साटेलोटे होणार नाही. तर शरद पवार आणि राज ठाकरे यांच्या मनोमिलनात कदाचित अडथळा येऊ शकतो. अन्यथा, ही मंडळी आपापसात मिळून मिसळून सता ताब्यात घेऊ शकतात. कोणतेही, कसेही राजकीय समीकरण होऊ शकते.

### काँग्रेस पक्ष एकाकी पडेल..

या उलट काँग्रेस पक्षाचे शरद पवार वगळता कोणाशी मिळून मिसळून घेण्याचे धोरण राहील, असे वाटत नाही. उद्धव ठाकरे हा नाईलाज म्हणून स्वीकारलेला पर्याय आहे. पण, तो बाजूला झाल्यास काँग्रेसला आनंद झालेला असेल. त्यामुळे काँग्रेस पक्ष या सहा पक्षांपैकी कमीत कमी इतर राजकीय पक्षांबरोबर जुळवून घेणारा पक्ष असेल. सध्या तरी उद्धव ठाकरे आणि शरद पवार हे दोन पर्याय त्यांच्या अर्थात काँग्रेससमोर आहेत. त्यातून ठाकरे बंधू एकत्र आल्यास काँग्रेस केवळ शरद पवार आणि शरद पवारही भाजपबरोबर गेल्यास काँग्रेस स्वतःच्याच बळावर निवडणुका लढू शकेल,

### काँग्रेसला स्वतःला सिद्ध करण्याची संधी..

एका अधनि काँग्रेसला स्वतःला सिद्ध करण्यास ही संधी असेल, त्याच बरोबर ठाकरे बंधू एकत्र आल्याने महाराष्ट्राचे राजकारण मोठ्या प्रमाणात बदलेल, हा भ्रमही आत्ताच मतदारांचा संपलेला असेल. या बंधूना मुंबई ताब्यात हवी तर शरद पवार यांना पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भातील काही भाग. यातील त्यांची महत्त्वाची ठिकाणे ताब्यात हवी आहेत. एकनाथ शिंदे यांना मुंबई, ठाणे, कल्याण या भागात रस आहे. तर भारतीय जनता पक्षाला महाराष्ट्राचे राजकारण आणि पुढे जाऊन देशाचे राजकारण करायचे आहे.

### भाजपाला ताकद वाढवायची आहे..

भाजपाला २०२९ च्या निवडणुका स्वबळावर लढवायच्या आहेत. यासाठी महाराष्ट्रात मुंबई महापालिकेत आपलीच सत्ता कशी येईल, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही आपले प्राबल्य कसे वाढेल, याकडे लक्ष दिले जाईल. अखेरीस काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष हे दोन पक्ष राष्ट्रीय पातळीवरचे पक्ष राहतील आणि प्रादेशिक पक्षांना या दोघांपैकी कोणाच्यातरी एकाच्या वळचणीला आश्रित म्हणून जाण्याशिवाय, उभे राहण्याशिवाय पर्याय राहणार नाही, असे दिसते. मूळ मुद्दा असा आहे, की ठाकरे बंधू एकत्र आले तरी राजकारणात फार काही बदल घडू शकेल, असे वातावरण मुळीच नाही, त्या भ्रमात कोणीही राहू नये !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सांगली शिक्षण संस्थांच्या शाळा सुरू!

## राज्यातील शाळांची पहिली घंटा 16 जून रोजी वाजणार

| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**राज्यातील शाळांची पहिली घंटा १६ जून रोजी वाजणार असतानाच एक आठवडा अगोदर सांगली शिक्षण संस्थांच्या शाळा आजपासून सुरू झाल्या. पाचवीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी, विद्यार्थिनींचे शाळेतील शिक्षिकांनी फुलपाकळ्यांची उधळण करत औक्षण करून स्वागत केले. जिल्ह्यातील शाळांचे पहिले सत्र दि. १६ जूनपासून सुरू होत आहे. मात्र, सांगली शिक्षण संस्थेने एक आठवडा अगोदरच यंदाच्या शैक्षणिक सत्राचा प्रारंभ केला.**



आज शाळेच्या पहिल्या दिवशी मुलांचे स्वागत ढोलताशांच्या गजरात करण्यात आले. शाळेच्या प्रवेशदारावर रांगोळी काढून फुलांचा सडा टाकण्यात आला होता. तसेच पाचवीच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे औक्षणही करण्यात येत होते. यानंतर नित्याप्रमाणे सामूहिक प्रार्थना झाल्यानंतर पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकांचे वाटपही करण्यात आले.दरम्यान, नवीन वर्षातील शैक्षणिक सत्र १६ जूनपासून सुरू होत असून, दि. १६ ते ३० जून या कालावधीत प्रवेशोत्सव कार्यक्रम शिक्षण विभागाच्यावतीने राबविण्यात येणार आहे. या कालावधीत दाखलपात्र मुलांची यादी तयार करून ती चौकात प्रदर्शित करण्याच्या सूचना शाळांना देण्यात आल्या असल्याचे शिक्षणाधिकारी मोहन गायकवाड यांनी सांगितले. शाळा सुरू होण्यापूर्वी तीन दिवस अगोदर गावात दवंडी देण्यात येणार आहे.

एक दिवस अगोदर शिक्षकामार्फत गृहभेटी निश्चित करण्यात आल्या आहेत. शाळेच्या पहिल्या दिवशी मुलांचे स्वागत स्थानिक लोकप्रतिनिधी, शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांकडून पुष्प देऊन करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. शाळेचा पहिला दिवस पुस्तक दिन म्हणून साजरा करण्यात येत असून, याच दिवशी मुलांना पुस्तके वितरीत केली जाणार आहेत.आज शाळेच्या पहिल्या दिवशी मुलांचे स्वागत ढोलताशांच्या गजरात करण्यात आले.

शाळेच्या प्रवेशदारावर रांगोळी काढून फुलांचा सडा टाकण्यात आला होता. तसेच पाचवीच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे औक्षणही करण्यात येत होते. यानंतर नित्याप्रमाणे सामूहिक प्रार्थना झाल्यानंतर पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकांचे वाटपही करण्यात आले.दरम्यान, नवीन वर्षातील शैक्षणिक सत्र १६ जूनपासून सुरू होत असून, दि. १६ ते ३० जून या कालावधीत प्रवेशोत्सव कार्यक्रम शिक्षण विभागाच्यावतीने राबविण्यात येणार आहे. या कालावधीत दाखलपात्र मुलांची यादी तयार करून ती चौकात प्रदर्शित करण्याच्या सूचना शाळांना देण्यात आल्या असल्याचे शिक्षणाधिकारी मोहन गायकवाड यांनी सांगितले. शाळा सुरू होण्यापूर्वी तीन दिवस अगोदर गावात दवंडी देण्यात येणार आहे. एक दिवस अगोदर शिक्षकामार्फत गृहभेटी निश्चित करण्यात आल्या आहेत. शाळेच्या पहिल्या दिवशी मुलांचे स्वागत स्थानिक लोकप्रतिनिधी, शाळेचा पहिला दिवस पुस्तक दिन म्हणून साजरा करण्यात येत असून, याच दिवशी मुलांना पुस्तके वितरीत केली जाणार आहेत.

### गोळी काढून फुलांचा सडा टाकण्यात आला

आज शाळेच्या पहिल्या दिवशी मुलांचे स्वागत ढोलताशांच्या गजरात करण्यात आले. शाळेच्या प्रवेशदारावर रांगोळी काढून फुलांचा सडा टाकण्यात आला होता. तसेच पाचवीच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे औक्षणही करण्यात येत होते. यानंतर नित्याप्रमाणे सामूहिक प्रार्थना झाल्यानंतर पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकांचे वाटपही करण्यात आले.दरम्यान, नवीन वर्षातील शैक्षणिक सत्र १६ जूनपासून सुरू होत असून, दि. १६ ते ३० जून या कालावधीत प्रवेशोत्सव कार्यक्रम शिक्षण विभागाच्यावतीने राबविण्यात येणार आहे. या कालावधीत दाखलपात्र मुलांची यादी तयार करून ती चौकात प्रदर्शित करण्याच्या सूचना शाळांना देण्यात आल्या असल्याचे शिक्षणाधिकारी मोहन गायकवाड यांनी सांगितले. शाळा सुरू होण्यापूर्वी तीन दिवस अगोदर गावात दवंडी देण्यात येणार आहे.

# चंद्रहार पाटील यांचा शिवसेनेत प्रवेश

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना टोला

| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**चंद्रहार पाटील यांनी आज एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चंद्रहार पाटील यांच्या हाती शिवसेनेचा झेंडा दिला. त्यानंतर डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांचा शिवसेनेत प्रवेश झाला. एकनाथ शिंदे म्हणाले, "ठाण्यातल्या घटनेत जे लोक जखमी झाले.**



त्यांना मी भेटून आलो, विचारपूस केली त्यामुळे मला चंद्रहार पाटील यांच्या पक्ष प्रवेश कार्यक्रमात यायला थोडा उशीर झाला. आज डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांचा शिवसेनेत प्रवेश झाला हे मी जाहीर करतो आणि त्यांचं स्वागत करतो" असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.चंद्रहार पाटील हे नकली आखाड्यातून असली आखाड्यात आले आहेत. पाटील तुम्ही कुटील माणसाकडून स्वच्छ मनाच्या माणसाकडे आला आहात. हा हॉल नाही तर आखाडा झाला आहे त्यामुळे पैलवानांच्या शिट्ट्या तर ऐकू येणारच असंही एकनाथ शिंदे म्हणाले. चंद्रहार पाटील तुम्हाला एकच सांगतो तुम्ही आमच्याकडे आला आहात आता यापुढे ज्याची होणार नाही हार तो तुमचा आवडता डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार. चंद्रहार पाटील आम्हाला सगळ्यांना तुमचा अभिमान आहे असंही एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.कुस्तीत अनेक डावपेच असतात. मी कुस्तीतला पैलवान नसलो तरीही २०२२ समोरच्या सगळ्यांना चारी मुंड्या चीत केलं. असे डावपेच टाकले की अजून ते उठलेच नाहीत. पैलवान हे आपल्या महाराष्ट्राचं वैभव आहेत. त्यामुळे चंद्रहार पाटील यांच्यावर आता मोठी जबाबदारी आहे. अनिल बाबर यांनाही कधीच विसरता येणार नाही. अनिल बाबर माझ्या खांद्याला खांदा लावून सुरुवातीपासून बरोबर होते. मी महाराष्ट्राच्या बाहेर गेलो तरीही अनिल बाबर यांचे लोक मला भेटतात. अनिल बाबर यांनी देश व्यापून टाकला होता. अनिल बाबर आपल्यात नाहीत पण त्यांचे चिरंजीव सुहास आपल्या बरोबर आहेत.

### लांडगा कधी वाघ होत नाही

सांगलीची माणसं चांगलीच असतात, असं एकनाथ शिंदे म्हणाले.मीदेखील शेतकऱ्याचा मुलगा आहे. मी शाखाप्रमुख होतो तिथपासून राज्याचा मुख्यमंत्री झालो हे अजूनही काही लोकांना पटत नाही. मी त्यांच्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रासाठी हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखाना मोफत सुरु केला आहे. ज्यांना पोटदुखी झाली आहे त्यांनी तिकडे जावं आणि त्यांच्यासाठी व्यवस्था करून ठेवली आहे. वाघाचं कातडं पांघरुन लांडगा कधी वाघ होत नाही. त्यासाठी बाळासाहेब ठाकरेंचे विचारच लागतात. ज्याने बाळासाहेबांचे विचार पायदळी तुडवले त्यांना त्याची प्रचिती येते आहे. हा एकनाथ शिंदे सामान्य कार्यकर्ता आहे. हा पक्ष तुमचा आहे, इथे काही कुणी मालक नाही. राजा का बेटा राजा नहीं बनेगा असं श्रीकांत शिंदेही म्हणाले होते.

# माझा अपमान जसा व्हायरल झाला!

## डॉक्टरांनी नाकारली गोव्याच्या आरोग्यमंत्र्यांची माफी

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**गोव्याचे आरोग्य मंत्री विश्वजीत राणे यांचा गोवा वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी असलेल्या डॉक्टरांना फटकारतानाचा व्हिडीओ चांगलाच व्हायरल झाला होता. यानंतर राणे यांच्यावर विरोधकांकडून चांगलीच टीका केली जात होती. यादरम्यान राणे यांनी झालेल्या प्रकाराबद्दल माफी देखील मागितली. मात्र मंत्र्यांनी मागितलेली ही माफी डॉक्टरांनी नाकारली आहे.**



डॉ. रुद्रेश कुट्टीकर यांनी राणे यांनी मागितलेली माफी ही 'स्टुडिओ माफी' असल्याचे म्हटले आहे. तसेच त्यांनी शनिवारी कॅज्युअल्टी विभागात ज्या ठिकाणी मंत्र्यांनी त्यांना फटकारले होते त्याच ठिकाणी त्यांनी जाहीरपणे माफी मागावी अशी मागणी देखील डॉक्टरांनी केली आहे."मंत्र्यांनी कॅज्युअल्टी विभागात यावे आणि त्याच ठिकाणी जाहीरपणे माफी मागावी," असे कुट्टीकर द इंडियन एक्सप्रेसशी बोलताना म्हणाले आहेत.डॉक्टरांनी मंत्र्यांनी मेडिकल कॉलेजमध्ये ज्या पद्धतीचे वर्तन केले त्याविरोधात डॉक्टरांकडून आंदोलन केले जात असल्याच्या पार्श्वभूमीवर राणे यांनी सोमवारी सकाळी माफी मागितली आहे. दरम्यान कुट्टीकर यांनी सोमवारी दुपारी जीएमसी येथे माध्यमांशी बोलताना मंत्र्यांनी २४ तासाच्या आत पहिली घटना घडली त्या ठिकाणी येऊन माफी मागीतली पाहिजे असे सांगितले. राणे यांनी माफी मागितल्याबद्दल बोलताना कुट्टीकर म्हणाले की, "मी व्हिडीओ पाहिला आहे, पण ती एक स्टुडिओ माफी आहे... सर्व डॉक्टरांचा मागणी आहे की घटना जिथे घडली तेथेच माफी मागीतली पाहिजे... लोकांच्या समोर. जेणेकरून ते रेकॉर्ड केले जाऊ शकेल. माझा अपमान जसा व्हायरल झाला, तसेच हे (माफी) देखील व्हायरल होईल. माझा त्या दिवशी पूर्णपणे अपमान करण्यात आला... त्यामुळे, मला वाटते की सर्वांना माफीबद्दल माहिती असले पाहिजे. २४ तासांच्या आत त्यांना माफी मागावीच लागेल."शनिवारी घडलेल्या घटनाक्रमाबद्दल सांगताना कुट्टीवार म्हणाले की, "कोणीतरी रुग्णालयाच्या कॅज्युअल्टी वॉर्डमध्ये आले आणि त्याने नातेवाईकाला व्हिटॅमिन बी१२ इंजेक्शन देण्यास सांगितले. "बी१२ इंजेक्शन हे काही एमर्जन्सी इंजेक्शन नाही. त्यामुळे आम्ही म्हणालो की तुम्ही ओपीडीमध्ये किंवा जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात जा. टर्शरी केअर रुग्णालयाच्या कॅज्युअल्टी वॉर्डमध्ये फक्त गंभीर आणि क्रिटिकल रुग्णांवर उपचार केले जातात, त्यामुळे हा प्रोटोकॉल आहे. पण सध्या साधी प्रकरणे देखील एमर्जन्सी विभागात येतात." तसेच ते म्हणाले की जर त्यांची प्रत्यक्षात येऊन माफी मागावी ही मागणी मान्य केली गेली नाही तर संप केला जाईल. दरम्यान सोमवारी सकाळी या प्रकरणी रुग्णालयाच्या बाहेर डॉक्टरांनी घोषणाबाजी केली आणि मंत्र्यांनी जाहीर माफी मागण्याची मागणी देखील केली. या आंदोलन करणाऱ्या डॉक्टरांनी सांगितले की मंगळवारी संप किंवा आरोग्य सेवा बंद ठेवण्याबाबतचा निर्णय घेतला जाईल.डॉ. रुद्रेश कुट्टीकर यांनी राणे यांनी मागितलेली माफी ही 'स्टुडिओ माफी' असल्याचे म्हटले आहे. त्याच ठिकाणी त्यांनी जाहीरपणे माफी मागावी अशी मागणी देखील डॉक्टरांनी केली आहे.

### मोदी कॅनडाला जाणार

"मंत्र्यांनी कॅज्युअल्टी विभागात यावे आणि त्याच ठिकाणी जाहीरपणे माफी मागावी," असे कुट्टीकर द इंडियन एक्सप्रेसशी बोलताना म्हणाले आहेत.डॉक्टरांनी मंत्र्यांनी मेडिकल कॉलेजमध्ये ज्या पद्धतीचे वर्तन केले त्याविरोधात डॉक्टरांकडून आंदोलन केले जात असल्याच्या पार्श्वभूमीवर राणे यांनी सोमवारी सकाळी माफी माहितली आहे. दरम्यान कुट्टीकर यांनी सोमवारी दुपारी जीएमसी येथे माध्यमांशी बोलताना मंत्र्यांनी २४ तासाच्या आत पहिली घटना घडली त्या ठिकाणी येऊन माफी मागीतली पाहिजे असे सांगितले. राणे यांनी माफी मागितल्याबद्दल बोलताना कुट्टीकर म्हणाले की, "मी व्हिडीओ पाहिला आहे.

# भारतातील रस्ते अमेरिकेसारखे होतील!

## मुख्य चित्रपट तर अजून सुरू व्हायचा आहे : नितीन गडकरी

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**देशात मोदी सरकारला ११ वर्ष पूर्ण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर भाजपा देशभरात सरकारने केलेल्या कामांबद्दल माहिती देताना दिसत आहे. यादरम्यान भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सोमवारी एका मुलाखतीत येत्या दोन वर्षांमध्ये भारतातील रस्ते तुलनेने अमेरिकेच्या बरोबरीचे होतील असे म्हटले आहे.**



एएनआय या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत बोलताना गडकरी म्हणाले की, "प्रश्न हा फेसलिफ्टचा नाही, ते आधीच बदलले आहे. तुम्ही आत्ताच न्यूज रील पाहिली, मुख्य चित्रपट तर अजून सुरू व्हायचा आहे. पाईपलाईनमध्ये असलेले प्रकल्प वेगाने पिढे जात आहेत. आणखी दोन वर्षात तुम्ही पाहू शकाल की भारतातील रस्त्यांच्या पायाभूत सुविधा अमेरिकेसारख्या होतील."अमेरिकेती काही लोक मला भेटले आणि म्हणाले की आपल्या पायाभूत सुविधा या अमेरिकेपेक्षा चांगल्या आहेत, असेही गडकरी पुढे बोलताना म्हणालेभविष्यात होऊ घातलेल्या प्रकल्पांबद्दल बोलताना गडकरी म्हणाले की, २५ ग्रीनफिल्ड एक्सप्रेसवे, एक ३,००० किमीचा पोर्ट कनेक्टिव्हिटी हायवे आणि धार्मिक पर्यटन सर्किट्सना जोडणाऱ्या १ लाख कोटी रुपये किमतीच्या रस्त्यांचे काम सुरू आहे . यावेळी गडकरी यांनी बौद्धीष्ट सर्किट्स आणि चार धाम यांना ऑल-वेदर रस्त्यांनी जोडण्याच्या योजनेबद्दलही भाष्य "आम्ही जम्मू आणि श्रीनगर यामध्ये ३६ बोगदे विकसित करत आहोत, ज्यापैकी २३ पूर्ण झाले आहेत आणि आणखी ४-५ बोगद्यांचे काम सुरू आहे. आम्ही पर्वतमाला योजनेअंतर्गत १५ रोपवे विकसित करत आहोत, याशिवाय ३५ मल्टी-मोडल लॉजिस्टिक्स पार्क देखील विकसित करत आहोत. दिल्ली ते श्रीनगर ८ तासात, दिल्ली ते जयपूर २ तास, चेन्नई ते बंगळुरू २ तासात, बंगळुरू ते म्हैसूर १ तासात, मेरठ ते दिल्ली ५० मिनिटात पोहचता येईल.

### 4-5 बोगद्यांचे काम सुरू

"आम्ही जम्मू आणि श्रीनगर यामध्ये ३६ बोगदे विकसित करत आहोत, ज्यापैकी २३ पूर्ण झाले आहेत आणि आणखी ४-५ बोगद्यांचे काम सुरू आहे. आम्ही पर्वतमाला योजनेअंतर्गत १५ रोपवे विकसित करत आहोत, याशिवाय ३५ मल्टी-मोडल लॉजिस्टिक्स पार्क देखील विकसित करत आहोत," असेही गडकरी म्हणाले. आम्ही यासारखे आणखी २५ ग्रीन एक्सप्रेस हायवे तयार करत आहेत जसे की उत्तराखंड येथील हेमकुंड रोपवेज.... आम्ही दिल्लीला वाहतूक कोंडी आणि प्रदूषणाच्या समस्यांपासून मुक्त करण्यासाठी १.५ लाख कोटी रुपयांचे रस्ते बनवत आहोत," असे ते म्हणाले.एएनआय या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत बोलताना गडकरी म्हणाले की, "प्रश्न हा फेसलिफ्टचा नाही, ते आधीच बदलले आहे.

# म्हणून अमृता सुभाषवर रागवले होते नसीरुद्दीन शाह



अमृता सुभाषने आजवर अनेक चित्रपट, वेब सीरिजमध्ये काम केलं आहे. नुकताच तिचा 'जारण' हा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. अमृताने मराठीसह हिंदीतही महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. तिने 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'मधून अभिनयाचं शिक्षण घेतलं आहे. यावेळी तिने तिच्या तेथील एका नाटकाबद्दल सांगितलं आहे. तिच्या या नाटकाला अभिनेते नसीरुद्दीन शाह उपस्थित असल्याचं म्हटलं आहे.'लल्लनटॉप'शी संवाद साधताना अमृता म्हणाली, "मी 'त्रीष्ना' नावाचं एक नाटक करत होते. त्यामध्ये एक सीन होता, जिथे मला रडायचं असतं आणि लोक त्या सीनचं कौतुक करायचे. त्यामुळे मला असं वाटलं की, मी खूप छान काम करत आहे. मला माझा खूप अभिमान वाटत होता, अहंकार निर्माण झाला होता. तेव्हा नसीरुद्दीन सर आले. त्यांनी माझे दोन प्रयोग पाहिले आणि त्यांनी पाहिलं की लोक माझं कौतुक करत आहेत, त्यामुळे मला असंच वाटत होतं की इतरांप्रमाणे तेसुद्धा माझं कौतुकच करणार आहेत. प्रयोग संपल्यानंतर आम्ही एका चहाच्या टपरीजवळ उभे होतो. तिथे नसीरुद्दीन सर होते, ते माझ्याकडे येत आहेत हे मला माहीत होतं; पण मी माहीत नसल्यासारखं केलं."नसीरुद्दीन सर माझ्याकडे आले आणि म्हणाले, अमृता मला काळजी वाटतेय. त्यांचं हे बोलणं ऐकून मला आश्चर्य वाटलं. मला वाटलेलं लोकांनी एवढं कौतुक केलं आहे, पण मग यांना काळजी का वाटतेय." अमृता पुढे म्हणाली, ते मला म्हणाले

# पाव्हणं जेवला काय..!

झी मराठी' वाहिनीवर २ जूनपासून 'देवमाणूस- मधला अध्याय' ही नवीन मालिका प्रेक्षकांच्या भेटीला आली. या मालिकेत लोकप्रिय अभिनेता किरण गायकवाड प्रमुख भूमिका साकारत आहे. यापूर्वीच्या 'देवमाणूस' मालिकेच्या गाजलेल्या दोन्ही सीझनमध्ये किरणनेच मुख्य भूमिका साकारली होती. सध्या ही मालिका एका खास कारणामुळे चर्चेत आली आहे. 'देवमाणूस' मालिकेच्या नुकत्याच सुरू झालेल्या सीझनमध्ये लवकरच लोकप्रिय नृत्यांगना गौतमी पाटील एन्ट्री घेणार आहे. तिच्या ठसकेबाज लावणीची सोशल मीडियावर नेहमीच चर्चा असते. याशिवाय गौतमीचा चाहतावर्गही गावागावांत मोठ्या प्रमाणात आहे. यामुळेच आता गौतमी छोटा पडदा गाजवण्यासाठी सज्ज झाली आहे. 'झी मराठी'च्या 'देवमाणूस' मालिकेत तिची एन्ट्री होणार आहे.सध्या गौतमी पाटीलचे 'देवमाणूस' मालिकेच्या सेटवरचे अनेक व्हिडीओ व्हायरल होत आहे. यापैकी एका व्हिडीओमध्ये गौतमी पाटील आणि नरू आजी व्हायरल गाण्यावर डान्स करत असल्याचं पाहायला मिळत आहे. "पाव्हणं जेवला काय..." हे मराठी गाणं सोशल मीडियावर नेहमीच ट्रेंडिंग असतं. याच लोकप्रिय गाण्यावर गौतमी पाटील आणि नरू आजीने एकत्र जबरदस्त डान्स केला आहे.या व्हिडीओमध्ये नरू आजी... नऊवारी साडी, डोळ्याला गॉगल अशा डॅशिंग लूकमध्ये गौतमीसह थिरकली आहे. डान्स केल्यावर गौतमीने आजीला जवळ घेत तिचं कौतुक केल्याचं या व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे. नेटकऱ्यांनी या व्हिडीओवर कमेंट्सचा पाऊस पाडला आहे. "देवमाणूस मालिका कमाल आहे", "दोघीही सुंदर नाचल्या", "खरंतर ही आजीच सगळा शो पुढे घेऊन जात आहे", "जबरदस्त एनर्जी नरू आजी", "कमाल आजी भारी डान्स केला" अशा प्रतिक्रिया नेटकऱ्यांनी या व्हिडीओवर दिल्या आहेत.दरम्यान, या मालिकेची निर्माती श्वेता शिंदेने 'देवमाणूस'च्या निमित्ताने गौतमीला मोठी संधी दिली आहे. गौतमीने यापूर्वी अनेक गाण्यांचे व्हिडीओ अल्बम, 'घुंगरू' सिनेमा आणि रिॲलिटी शोमध्ये काम केलेलं आहे. मात्र, या मालिकेच्या निमित्ताने गौतमी पहिल्यांदाच मालिकेत अभिनय करताना दिसेल.



झी मराठी' वाहिनीवर २ जूनपासून 'देवमाणूस- मधला अध्याय' ही नवीन मालिका प्रेक्षकांच्या भेटीला आली. या मालिकेत लोकप्रिय अभिनेता किरण गायकवाड प्रमुख भूमिका साकारत आहे. यापूर्वीच्या 'देवमाणूस' मालिकेच्या गाजलेल्या दोन्ही सीझनमध्ये किरणनेच मुख्य भूमिका साकारली होती. सध्या ही मालिका एका खास कारणामुळे चर्चेत आली आहे. 'देवमाणूस' मालिकेच्या नुकत्याच सुरू झालेल्या सीझनमध्ये लवकरच लोकप्रिय नृत्यांगना गौतमी पाटील एन्ट्री घेणार आहे. तिच्या ठसकेबाज लावणीची सोशल मीडियावर नेहमीच चर्चा असते. याशिवाय गौतमीचा चाहतावर्गही गावागावांत मोठ्या प्रमाणात आहे. यामुळेच आता गौतमी छोटा पडदा गाजवण्यासाठी सज्ज झाली आहे. 'झी मराठी'च्या 'देवमाणूस' मालिकेत तिची एन्ट्री होणार आहे.सध्या गौतमी पाटीलचे 'देवमाणूस' मालिकेच्या सेटवरचे अनेक व्हिडीओ व्हायरल होत आहे. यापैकी एका व्हिडीओमध्ये गौतमी पाटील आणि नरू आजी व्हायरल गाण्यावर डान्स करत असल्याचं पाहायला मिळत आहे. "पाव्हणं जेवला काय..." हे मराठी गाणं सोशल मीडियावर नेहमीच ट्रेंडिंग असतं. याच लोकप्रिय गाण्यावर गौतमी पाटील आणि नरू आजीने एकत्र जबरदस्त डान्स केला आहे. या व्हिडीओमध्ये नरू आजी... नऊवारी साडी, डोळ्याला गॉगल अशा डॅशिंग लूकमध्ये गौतमीसह थिरकली आहे.

# 3 महिन्यांच्या ब्रेकनंतर 'ठरलं तर मग' मालिकेत एन्ट्री घेणार अभिनेत्री?

'ठरलं तर मग' मालिका सध्या रंजक वळणावर आहे. मालिकेत वात्सल्य आश्रमाच्या केसचा ट्रॅक सुरू असून, प्रियाचा खोटेपणा उघड करण्यासाठी अर्जुन-सायली नवनवीन प्लॅन्स आखत असल्याचं पाहायला मिळत आहे. मालिकेत कॉन्ट्रॅक्ट मॅरेजचं गुपित सर्वांसमोर उघड झाल्यापासून सध्या सुभेदारांच्या घरात सायलीशी कोणीही नीट बोलत नाहीये. तिला फक्त अर्जुनचा आधार असतो. हळुहळू सासूबाई कल्पना आणि पूर्णा आजीचं मन पुन्हा एकदा जिंकण्याचा सायली प्रयत्न करत आहे.मात्र, आता लवकरच सायलीला सुभेदारांच्या घरातील आणखी एका व्यक्तीची मनधरणी करावी लागणार आहे. काही दिवसांपूर्वीच अर्जुनची सख्खी बहीण अस्मिता तिच्या नवऱ्याकडे राहायला गेल्याचं पाहायला मिळालं होतं पण, आता अस्मिता मालिकेत पुन्हा एकदा एन्ट्री घेणार आहे. अस्मिताची भूमिता साकारणाऱ्या मोनिकाच्या इन्स्टाग्राम स्टोरीमुळे चाहत्यांना मोठी हिंट मिळाली आहे. खरंतर, मोनिका आई होणार असल्याने तिने या मालिकेतून ब्रेक घेतला होता. फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस शूटिंग पूर्ण करून मोनिका सुट्टीवर गेली होती. यानंतर मार्च महिन्यात अभिनेत्रीला मुलगी झाली. अभिनेत्रीच्या डॉक्टरांनी दिलेल्या सल्ल्यानुसार, आता मोनिकाची चिमुकली लेक ३ महिन्यांची झाल्यावर ती पुन्हा एकदा कामाला सुरुवात करणार आहे. मोनिकाने याआधी 'राजश्री मराठी'च्या मुलाखतीत आणि तिच्या युट्यूब व्लॉगमध्ये ती लवकरच मालिकेत परत असल्याचं सांगितलं होतं. आता मोनिकाने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवरून मालिकेच्या सेटवरचा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओला तिने "माय हॅपी प्लेस" असं कॅप्शन दिलं आहे.मोनिकाचा या व्हिडीओमधील अस्मिताच्या भूमिकेसारखा हुबेहूब लूक आणि यामधील बॅकग्राऊंड पाहता तिची 'ठरलं तर मग' मालिकेच्या सेटवर एन्ट्री झाल्याची दाट शक्यता आहे.दरम्यान, आता 'ठरलं तर मग' मालिकेत अस्मिता ( मोनिका दबाडे ) केव्हा येणार, तिच्या एन्ट्रीनंतर सायलीच्या आयुष्यात काय बदल होणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. ही मालिका 'स्टार प्रवाह' वाहिनीवर रात्री ८.३० वाजता प्रसारित केली जाते.'ठरलं तर मग' मालिका सध्या रंजक वळणावर आहे. मालिकेत वात्सल्य आश्रमाच्या केसचा ट्रॅक सुरू असून, प्रियाचा खोटेपणा उघड करण्यासाठी अर्जुन-सायली नवनवीन प्लॅन्स आखत असल्याचं पाहायला मिळत आहे. मालिकेत कॉन्ट्रॅक्ट मॅरेजचं गुपित सर्वासमोर उघड झाल्यापासून सध्या सुभेदारांच्या घरात सायलीशी कोणीही नीट बोलत नाहीये. तिला फक्त अर्जुनचा आधार असतो.

# क्लासेनने क्रिकेटमधून घेतली निवृत्ती?

## क्लासेनचं अचानक निवृत्ती घेण्यामागे धक्कादायक वक्तव्य

। नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**दक्षिण आफ्रिकेचा विस्फोटक फलंदाज हेनरिक क्लासेनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. क्लासेनने अचानक निवृत्ती जाहीर करत सर्वांनाच धक्का दिला. यापूर्वी त्याने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. क्लासेन त्याच्या फटकेबाजीच्या जोरावर संघासाठी सामना एकहाती फिरवू शकतो. पण त्याने ३३ व्या वर्षी अचानक निवृत्तीची घोषणा केली. पण आता क्लासेनने निवृत्ती घेण्यामागचं कारण स्पष्ट करत मोठं वक्तव्य केलं आहे.**





३३ वर्षीय क्लासेनने दक्षिण आफ्रिकेसाठी ४ कसोटी, ६० एकदिवसीय आणि ५८ टी-२० सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याने तिन्ही फॉरमॅटमध्ये ३ हजाराहून अधिक धावा केल्या आहेत. क्लासेनने अखेर निवृत्तीच्या निर्णयावर आपले मौन सोडले आणि म्हटले की, दक्षिण आफ्रिकेचा संघ जिंकू दे किंवा पराभूत होऊदे याबाबत त्याला काही वाटत नव्हते आणि हे बऱ्याच काळापासून त्याला जाणवत असल्याने त्याने निवृत्तीची घोषणा केली.क्लासेन इतकही म्हणाला की, तो २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकापर्यंत खेळू इच्छित होता, परंतु मुख्य प्रशिक्षक रॉब वॉल्टर यांनी व्हाईट-बॉल प्रशिक्षकपदावरून राजीनामा दिल्यामुळे आणि त्याला केंद्रीय करारातून वगळल्यामुळे त्याला आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा म्हणण्यास भाग पाडले गेले.क्लासेनने निवृत्तीबाबत बोलताना सांगितलं, "मला बऱ्याच दिवसांपासून असं वाटत होतं की मला माझ्या कामगिरीची किंवा संघ जिंकेल की नाही याची पर्वा वाटत नव्हती. त्यामुळे मी चुकीच्या ठिकाणी असल्याचं वाटत होतं. चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी, मी रॉबशी (रॉब वॉल्टर कोच) बराच वेळ चर्चा केली आणि मी त्याला सांगितलं की जे काही घडत आहे त्याबद्दल मला काही ठिक वाटत नाहीये."आम्ही (क्लासेन आणि कोच रॉब यांनी) एकमेकांशी छान चर्चा केली. आम्ही २०२७ च्या विश्वचषकापर्यंत सगळं व्यवस्थित प्लॅन केलं. त्यामुळे जेव्हा त्यांनी कोच म्हणून राजीनामा दिला आणि सेंट्रल कॉन्ट्रॅक्टच्या बाबतीत क्रिकेट दक्षिण आफ्रिकाशी योजनेनुसार चर्चा झाली नाही. तेव्हा मला निर्णय घेणं अजून सोपं झालं," असं क्लासेन पुढे म्हणाला.क्लासेन पुढे म्हणाला, "आता मी सहा-सात घरच्यांबरोबर राहू शकतो. माझ्या कुटुंबालाही मी सोबत असण्याची गरज आहे. गेली ४ वर्षे मी खूप प्रवास केलाय. आता मला थोड्या विश्रांतीची गरज आहे."क्लासेनची फिरकी गोलंदाजांविरुद्ध वादळी फटकेबाजीमुळे तो दक्षिण आफ्रिकेसाठी सर्व फॉरमॅटमध्ये महत्त्वाचा खेळाडू होता. क्लासेन आयसीसी पुरुष क्रिकेट विश्वचषक २०२३, आयसीसी पुरुष टी२० विश्वचषक २०२४ आणि आयसीसी पुरुष चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये खेळणाऱ्या दक्षिण आफ्रिकेच्या संघाचा सदस्य होता.३३ वर्षीय क्लासेनने दक्षिण आफ्रिकेसाठी ४ कसोटी, ६० एकदिवसीय आणि ५८ टी-२० सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याने तिन्ही फॉरमॅटमध्ये ३ हजाराहून अधिक धावा केल्या आहेत. क्लासेनने अखेर निवृत्तीच्या निर्णयावर आपले मौन सोडले.

### चुकीच्या ठिकाणी असल्याचं वाटत होतं

आणि म्हटले की, दक्षिण आफ्रिकेचा संघ जिंकू दे किंवा पराभूत होऊदे याबाबत त्याला काही वाटत नव्हते आणि हे बऱ्याच काळापासून त्याला जाणवत असल्याने त्याने निवृत्तीची घोषणा केली.क्लासेन इतकही म्हणाला की, तो २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकापर्यंत खेळू इच्छित होता, परंतु मुख्य प्रशिक्षक रॉब वॉल्टर यांनी व्हाईट-बॉल प्रशिक्षकपदावरून राजीनामा दिल्यामुळे आणि त्याला केंद्रीय करारातून वगळल्यामुळे त्याला आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा म्हणण्यास भाग पाडले गेले.क्लासेनने निवृत्तीबाबत बोलताना सांगितलं, "मला बऱ्याच दिवसांपासून असं वाटत होतं की मला माझ्या कामगिरीची किंवा संघ जिंकेल की नाही याची पर्वा वाटत नव्हती. त्यामुळे मी चुकीच्या ठिकाणी असल्याचं वाटत होतं. चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी, मी रॉबशी (रॉब वॉल्टर कोच) बराच वेळ चर्चा केली आणि मी त्याला सांगितलं की जे काही घडत आहे त्याबद्दल मला काही ठिक वाटत नाहीये.

# अश्विनने मैदानावरच पंचांशी घातला वाद!

## रागात स्वत:च्या पायावरच मारली बॅट; नेमकं काय घडलं?

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आर अश्विन आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला आहे, मात्र तो टी-२० लीगमध्ये खेळताना दिसत आहे. यंदा तो आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्स संघाकडून खेळताना दिसला. पण तो फारशी चांगली कामगिरी करू शकला नाही. आयपीएलनंतर आता अश्विन तमिळनाडू प्रीमियर लीगमध्ये खेळताना दिसत आहे. डिंडिगुल ड्रॅगन्स संघाकडून खेळताना रविवारी झालेल्या सामन्यात त्याच्या प्रतिक्रियेने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं.**

आयड्रीम तिरुप्पुर तमिझान्स विरुद्धच्या सामन्यादरम्यान अश्विनने महिला पंचांशी हुज्जत घातली. एसएनआर कॉलेज क्रिकेट ग्राउंडवर नेमकं असे काय घडले की अश्विनला पंचांशी वाद घालावा लागला, जाणून घेऊया.आर अश्विन हा डिंडिगुल ड्रॅगन्स संघाचा कर्णधार आहे. तो संघाकडून सलामीला उतरतो. त्याने संघाला चांगली सुरुवातही करून दिली पण जेव्हा तो १८ धावांच्या वैयक्तिक धावसंख्येपर्यंत पोहोचला तेव्हा विरोधी संघाचा कर्णधार आर साई किशोरने त्याला बाद केले. साई किशोरच्या चेंडूवर अश्विन पायचीत झाला आणि इथूनच वाद सुरू झाला. मैदानावरील असलेल्या महिला पंचांनी अश्विनला बाद घोषित करताच तो चकित झाला. त्याने महिला पंचांना सांगितले की



चेंडू लेग स्टंपच्या बाहेर पडला आहे.फलंदाज बाद झाल्यानंतर पंचांच्या निर्णयाशी सहमत नसतो तेव्हा काहीवेळेस पंचांशी हुज्जत घालतानाचं चित्र आपण पाहिलं. हेच चित्र या सामन्यातही पाहायला मिळालं. पण या सामन्यात महिला पंच होत्या. अश्विन त्यांच्या निर्णयावर महिला पंचांशी वाद घालताना दिसला.अश्विनच्या वाद घालण्यामागचे कारण म्हणजे चेंडू लेग स्टंपच्या बाहेर गेला होतो, मग तो एलबीडब्ल्यू कसा होऊ शकतो. या मुद्द्यावर अश्विन महिला पंचांवर ओरडताना दिसला पण त्यांनी अश्विनचं अजिबात ऐकून घेतलं नाही. यानंतर, जेव्हा अश्विनने रिप्ले पाहिला तेव्हा चेंडू लेग स्टंपच्या बाहेर पडला होता हे खरे होते. पॅव्हेलियनमध्ये परतताना, अश्विन प्रचंड संतापला होता आणि त्याने बॅट जोरदार स्वत:च्या पायावर मारली.आर. अश्विनच्या संघाला लाजिरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले. संघ १६.२ षटकांत ९३ धावांतच गारद झाला. प्रत्युत्तरादाखल, विरोधी संघाने केवळ एक विकेट गमावून ११.५ षटकांत हे लक्ष्य सहज गाठले. अश्विनचीही फलंदाजांनी चांगली धुलाई केली. त्याने २ षटकांत २८ धावा दिल्या. यष्टीरक्षक तुषार राहेजाने ३९ चेंडूत नाबाद ६५ धावा करत संघाला विजय मिळवून दिला.आयड्रीम तिरुप्पुर तमिझान्स विरुद्धच्या सामन्यादरम्यान अश्विनने महिला पंचांशी हुज्जत घातली.

### अश्विनची फलंदाजांनी धुलाई केली

एसएनआर कॉलेज क्रिकेट ग्राउंडवर नेमकं असे काय घडलं की अश्विनला पंचांशी वाद घालावा लागला, जाणून घेऊया.आर अश्विन हा डिंडिगुल ड्रॅगन्स संघाचा कर्णधार आहे. तो संघाकडून सलामीला उतरतो. त्याने संघाला चांगली सुरुवातही करून दिली पण जेव्हा तो १८ धावांच्या वैयक्तिक धावसंख्येपर्यंत पोहोचला.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
। मंगळवार ।
। दि. 10 जून 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




EDUCATING MIND & HEART
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


CERTIFICATION COURSE BY MORAYA SHIKSHAN SANSTHA, CHINCHWAD
शिक्षणाबरोबरच सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व घडविणारी शाळा
2025-26
ADMISSIONS
OPEN
प्रज्वलितो ज्ञानमयो प्रदीपः
"यत् भावो – तत् भवति"
मोरया शिक्षण संस्था, चिंचवड
डिप्लोमा इन मॉन्टेसरी आणि नर्सरी शिक्षक प्रशिक्षण
* राष्ट्रीय स्तरावर वैध प्रमाणपत्र
* प्रात्यक्षिकवर भर,
* ग्रंथालय सुविधा
* अध्यापन शास्त्राबद्दलची माहिती
* बाल मानसशास्त्र व पोषण आणि खूप काही..
* शुल्क: १६,०००/- (२ हप्त्यांसह)
* १ सेमिस्टर कोर्स
* अभ्यासक्रम कालावधी: १५ जून २०२५ ते १५ डिसेंबर २०२५
* वेळ : सकाळी १० ते दुपारी २
प्लॉट क्र. 13, मोरया कॉलनी, सुदर्शन नगर, गोलांडे राम मंदिरासमोर, चिंचवड, पुणे 33
संपर्क
सुचित्रा आपटे - ९३२५१३२४०२
भाग्यश्री पंडित - ८०८७७०६१००


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292